आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत योजनांचे मुल्यमापन, सनियंत्रण व उपयोगिता तपासणे या योजनेंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.
(लेखाशिर्ष २२२५ एफ२८१)
( १०,कंत्राटी सेवा )

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०२६ /प्र.क्र.५८/कार्यासन-६**
ई-नस्ती क्रमांक १६३३६०१
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०६ मे,२०२६ .

**वाचा :-**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
२) आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय,क्र. बीयुडी-२०२४ /प्र.क्र.०२/कार्यासन-६ दि.२९.०३.२०२५
३) अधीक्षक अभियंता,सा.बां.(आदिवासी) मंडळ, नाशिक, यांचे पत्र क्र.जा.क्र.६३३/सन २०२६ दि.२७.०४.२०२६.

**प्रस्तावना :-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत योजनांचे मूल्यमापन, संनियंत्रण व उपयोगिता तपासणे या योजनेंतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे मनुष्यबळ पुरविण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या बांधकाम व्यवस्थापन कक्षामार्फत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग यांचे कार्यालयातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, लिपिक, वाहनचालक व शिपाई यांची नेमणुक करण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्यांचे मानधन देयके अदायगीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत अधीक्षक अभियंता,सा.बां.(आदिवासी) मंडळ,नाशिक यांनी संदर्भाधिन पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास अनुसरुन सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत तरतुदीतुन डिसेंबर,२०२६ अखेरपर्यंच्या मानधनाकरीता निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जमाती घटकासाठी मागणी क्र.टी-५ मधील मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक या मुख्य लेखाशिर्षाखाली योजनांचे मुल्यमापन, सनियंत्रण व उपयोगिता तपासणे या योजनेंतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे पुरवठा करण्यात आलेल्या मनुष्यबळाचे मानधन अदा करण्याकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत तरतुदीतुन रु.१०२.०० लाख इतका निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

(रु.लाखात)

| योजनेचे नाव | लेखाशिर्ष | बाब | सन २०२६-२७ मधील अर्थसंकल्पित निधी | सदर शा.नि. अन्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| योजनांचे मुल्यमापन, सनियंत्रण व उपयोगिता तपासणे | २२२५ एफ२८१ | १०,कंत्राटी सेवा | १०००.०० | १०२.०० |

२. उपरोक्त प्रमाणे **रु.१०२.०० लाख (अक्षरी रुपये एक कोटी दोन लाख फक्त) इतका निधी नियंत्रक अधिकारी म्हणून अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक** यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर तरतुद खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तीय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या शासन परिपत्रकातील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिकारी यांची राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०६१२२८४०३२२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN DNYANOBA KOTME
Date: 2026.05.06 12:34:43 +05'30'

**(प्रविण कोतमे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव,आदिवासी विकास विभाग यांचे स्विय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. मुख्य अभियंता,बांधकाम व्यवस्थापन कक्ष,आदिवासी विकास विभाग मंत्रालय,मुंबई.
५. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक/नागपुर.
६. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकम (आदिवासी) विभाग,नाशिक/ठाणे/अमरावती/चंद्रपुर.
७. वित्त विभाग ( अर्थसंकल्प-१९ ), मंत्रालय, मुंबई.
८. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
९. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. निवड नस्ती (कार्या-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.